


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले    संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड अंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार ८ सप्टेंबर २०२४ | अंक ३०३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# बाबांनो मी आहे:आरक्षणासाठी जीवन संपविणाऱ्या तरुणाच्या कुटुंबाचे जरांगे पाटीलांनी केले सांत्वन

## विखे- पाटील यांच्याशी चर्चा

राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे. विखे-पाटील यांच्यासोबत सामाजिक,राजकीय,आरक्षण विषयावर चर्चा झाली असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. जरांगे पाटील यांच्या बाबतीत राधाकृष्ण विखे- पाटील यांनी मागे एक वक्तव्य केले होते की, जरांगे पाटील स्वतःचे आंदोलन स्वतः संपवतील. यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले की तुम्हाला उत्तर मिळाले आहे.संपणाऱ्याकडे कोणी जात नसते. त्या शब्दाचे उलट जर केले तर लक्षात येतंय संपायला कोण लागले आहे.



मराठा समाजाला सरकार आरक्षण देत नाही म्हणून बीड येथील एका तरुणाने आपले जीवन संपविले आहे. मराठा समाजाला आरक्षण सरकार देत नाही सरकार शब्द पाळत नाही अशा आशयाची चिठ्ठी लिहून अर्जुन कवठेकर या तरुणाने गळफास घेतला आहे. या घटनेने खळबळ उडाली आहे. या दुर्दैवी तरुणाच्या पीडीत कुटुंबियांची मनोज जरांगे यांनी भेट घेत त्यांचे सांत्वन केले आहे. आणि असे आततायी पाऊल न उचलण्याच आवाहन केले आहे.मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकार टाळाटाळ करीत आहे. या संदर्भात मनोज जरांगे यांनी अनेकदा उपोषण केलेले आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे यांनी केलेली आहे. परंतू सरकारने यावर कोणताही निर्णय घेतलेला नाही. सरकारच्या चालढकलीला कंठाळून मराठा समाजाला सरकार आरक्षण देत नाही, सरकार शब्द पाळत नाही अशा आशयाची चिठ्ठी लिहून अर्जुन कवठेकर या तरुणांना आज गळफास घेऊन जीवन संपविले आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. या तरुणाच्या पीडीत कुटुंबाचे मनोज जरांगे पाटील यांनी आज भेट घेऊन त्या कुटुंबाचे सांत्वन केले आहे.मराठा आरक्षणासाठी जीवन संपविणाऱ्या कवठेकर यांच्या कुटुंबाचे मनोज जरांगे पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देत सांत्वन केले. यावेळी पीडीत कुटुंबाल अश्रु अनावर झाले. यावेळी जरांगे पाटील यांनी यावेळी सांगितले की बाबांनो आत्महत्या करू नका मी आरक्षण देईन, असे आवाहन तरुणांना केले. कोणीही आत्महत्या करू नका मी आरक्षण देण्यास समर्थ आहे असंही मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी सांगितले. अर्जुन कवठेकर या तरुणाच्या आत्महत्येला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे दोघेही जबाबदार आहेत. आता मी त्यांना सोडणार नाही.आता आरक्षण देत कसे नाहीत हे मी पाहतो.मात्र तरुणांनी आत्महत्या करून कुटुंब उघड्यावर आणू नये असे आवाहन म्हणून जरांगे पाटील यांनी केले आहे.

## दसरा मेळाव्याच्या तयारीचा आढावा

दसरा मेळाव्याची पाहणी करण्यासाठी आपण जात आहे. गडाकडे जाणारे रस्ते अरुंद आहेत, मेळाव्यासाठी लागणाऱ्या पार्किंगच्या जागेचे आणि दसरा मेळाव्याच्या मुख्य ठिकाणाची पाहणी करुन आपण आढावा घेणार असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातुन मराठा समाज दसरा मेळाव्याला येणार आहे. समाजामध्ये प्रचंड चिड आहे, आरक्षण बाबतीत सरकार दगा फटका करण्याच्या तयारीत आहे असेही जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

## प्रसाद लाड यांच्यावर टीका

प्रसाद लाड काय बाजारात बैल विकणारा व्यापारी आहे का..? सर्व बोललो, त्याला माहित नाही का..? त्यांना भूकायला सांगितले आहे. आमच्या लोकांचे बलिदान जात आहे, आचारसंहिता लावली आणि निवडणूक घेतली तर सरकारला दाखवतोच असा इशारा जरांगे पाटील यांनी यावेळी दिला.

# महाराष्ट्रासाठी भाजपचा खास माधव प्लान, जाणून घ्या तो आहे तरी काय?

**दैनिक लोकआरंभ//**

हरियाणा आणि जम्मू-काश्मीर या दोन राज्यात विधानसभा निवडणुकीचा उद्या निकाल लागणार आहे. एक्झिट पोलमध्ये हरियाणामध्ये काँग्रेसचं सरकार तर जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेस-एनसीचे सरकार येण्याची शक्यता वर्तवली आहे. या दोन्ही राज्यानंतर आता संपूर्ण देशाचं लक्ष महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीकडे लागले आहे. कारण येथे दोन मोठ्या पक्षात फूट पडल्याने त्यानंतर



पहिल्यांदाच निवडणुका होणार आहेत. भाजपला महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचे सरकार आणायचे आहे. त्यासाठी भाजप नेत्यांकडून खास रणनीती आखण्यात आली आहे. एकीकडे मनोज जरांगे पाटील हे भाजपसाठी डोकेदुखी ठरत असताना याला पर्याय म्हणून भाजप इतर जातीच्या लोकांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्लान आखू शकते. भाजपचे केंद्रीय नेतृत्व महाराष्ट्राच्या नियोजनात सध्या व्यस्त आहे. कारण महाराष्ट्रात मराठा आंदोलनाचा फटका बसू नये म्हणून विशेष काळजी घेतली जाणार आहे. मराठा आंदोलनामुळे मोठा फटका गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला फक्त 9 जागा मिळाल्या होत्या. तब्बल 14 जागांचा फटका बसला होता. याची वेगवेगळी कारणे होती. अजित पवार यांच्या पक्षाशी युती करूनही भाजपला फायदा झाला नसल्याचं भाजपच्याच नेत्यांनी म्हटलं होतं. मराठा आंदोलनामुळे मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांनाच लक्ष्य केल्याने त्याचा ही फटका भाजपला बसला होता. भाजपला मराठवाड्यात एकही जागा मिळाली नाही. पश्चिम महाराष्ट्रात फक्त दोन जागा मिळाल्या. आता जर माळी, धनगर, वंजारी या पारंपारिक मतदारांनी जर भाजपला साथ दिली तर भाजपचा त्याग केला. राजकारणात 'माधव' या नावाने प्रसिद्ध असलेल्या या जातीतील शेतकरी महाराष्ट्रातील कांदा उत्पादक आहेत. कांद्याच्या भावामुळे त्यांचा मूड बदलतो. आता या जातींना खतपाणी घालण्यासाठी भाजपने नवी रणनीती आखली आहे.

## माधव फॉर्म्युला काय आहे

लोकसभा निवडणुकीत महायुतीला मराठा आंदोलनामुळे मोठा फटका बसला. देशात जातीय समीकरण फार महत्त्वाचे असते. ते जर व्यवस्थित कोणत्याही पक्षाने साधले तर त्याच्यासाठी निवडणूक जिंकणे सोपे होऊन जाते. त्यामुळे भाजपने विधानसभा निवडणुकीसाठी खास माधव प्लान आखल्याचं समोर येत आहे. भाजपने ओबीसींवप लक्ष केंद्रित केलं. ज्यामध्ये माळी(मा), धनगर (ध) आणि वंजारी (व) समाजाच्या लोकांना जवळ करण्याचा भाजपचा प्लान असेल. माधव फॉर्म्युला मजबूत करण्यासाठी सरकारने कांदा निर्यात शुल्क कमी केले. पंतप्रधान मोदींनी नुकतेच बंजारा हेरिटेज म्युझियमचेही उद्घाटन केलंय. याशिवाय मराठा समाजाला आपल्याकडे कसे आकर्षित करता येईल यासाठी मराठा नेत्यांना मैदानात उतरवले जाण्याची शक्यता आहे.

# २ वर्षांच्या मुलीला भरधाव टेम्पोने चिरडलं,

## , विरारमध्ये भीषण अपघात, चिमुकलीचा मृत्यू

मुंबईतील विरार येथे एक भीषण अपघात झाल्याचे समरो आले आहे. एका पिकअप टेम्पोने अवघ्या दोन वर्षांच्या मुलीला चिरडल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. यामध्ये त्या अवघ्या 2 वर्षांच्या चिमुकल्या मुलीचा मृत्यू झाल्याने एकच खळबळ माजली आहे. – विरार पश्चिमेकडील डोंगरपाडा परिसरात सोमवारी दुपारच्या सुमारास ही घटना घडली आहे. आमुळे चिमुकल्या मुलींच्या कुटुंबावर शोककळा पसरली असून परिसरातील नागरिकांकडून हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विरार पश्चिमेच्या डोंगरपाडा परिसरात हा भीषण अपघात घडला. आत्माराम पार्क परिसराजवळील एका घरात सिंग कुटुंब राहतं. त्यांची दोन वर्षांची मुलगी मृत्यूमुखी पडली. विरार पश्चिम आत्माराम पार्क परिसरातील इमारतीच्या गेट जवळ दुधाचा पिक टेम्पो हा गाडी रिव्हर्स घेत होता. मात्र तेवढ्यात त्या गाडीची दोन वर्षांच्या चिमुकलीला धडक बसली आणि ती चाकाखाली चिरडली गेली. त्यामध्ये त्या छोट्या बालिकेचा जागीच मृत्यू झाला.

# पिडीत चिमुकलीला न्याय देण्यासाठी माजलगावकर रस्त्यावर

माजलगाव : ( प्रतिनिधी ) पिडीत चिमुकलीला न्याय देण्यासाठी आज दुपारी हजारो माजलगावकर रस्त्यावर उतरले होते. शहर कडकडीत बंद ठेवुन प्रत्येकजण या मोर्चामध्ये सहभागी झाला होता. चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशी द्या, संस्थाचालकावरही गुन्हा दाखल करा अशी मागणी रस्त्यावर उतरलेल्या संतप्त माजलगावकरांनी प्रशासनाकडे केली आहे. या मोर्चामध्ये महिला, शाळकरी मुला-मुलींची लक्षणीय उपस्थिती होती. त्याचबरोबर राजकीय नेत्यांसह सामाजिक कार्यकर्ते देखील मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चाची सुरूवात हनुमान चौकापासुन झाली. हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे तहसिल कार्यालयावर धडकला. यावेळी चिमुकल्यांनी तहसिलदारांना निवेदन दिले. प्रसंगी या मोर्चामध्ये अनेक राजकीय, सामाजिक



कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. माजलगाव तालुक्यात एका साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना २५ ते २८ सप्टेंबर दरम्यान घडली. या घटनेप्रकरणी मुलीच्या पालकांनी केलेल्या तक्रारीवरून गुरूवारी अज्ञात व्यक्ती विरोधात लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून शहरात सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. माजलगाव शहरात एका शाळेत बालवाडी आहे. त्यामध्ये परिसरातील लहान मुले मुली दररोज येतात या परिसरातीलच एक साडेपाच वर्षाची चिमुरडी नियमित शाळेत येते तिला त्याच शाळेतील एका अज्ञात इसमाने दि. २५ ते २८ सप्टेंबर रोजी डबा खाल्यानंतर अत्याचार केला. घटनेनंतर चिमुरडी ताप येऊन आजारी पडली त्यामुळे तिला दवाखान्यात उपचार करण्यात आले. घरी आल्यावर तिने शाळेत झालेली ही गोष्ट आपल्या पालकांना सांगितली. पांढरे कपडे घातलेला माणसाला मी ओळखते असेही सांगितले. या घटनेनंतर चिमूरडीच्या पालकांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुरूवारी तक्रार दिली त्यानुसार अज्ञात व्यक्ती विरुद्ध लैंगिक अत्याचार पोस्को अंतर्गत गून्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेनंतर पोलिसांनी सदरील अल्पवयीन मुलीची अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केली तर या घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय अधिकारी धीरजकुमार बच्चू व पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचे सह पोलीस उपनिरीक्षक सुनील दिंडे यांनी सदरील शाळेची चौकशी करून तेथील सीसीटीव्ही ची तपासणी केली तसेच या शाळेतील सर्व शिक्षकांची ओळख परेड घेतली तसेच शिक्षकांच्या फोटो मधून सदरील चिमुरडीने आरोपी शिक्षकाचा फोटो पाहून त्याची ओळख पटवली त्यानंतर पोलिसांनी संबंधित शिक्षक राहुल अंबादास वायखिंडे ह.मु. माजलगाव मूळ गाव ब्रह्मगाव ता. कोपरगाव जि. (अहमदनगर) अहील्यानगर यास अटक केली आहे. दरम्यान या आरोपीस न्यायालयासमोर उभे केले असता न्यायदंडाधिकारी धर्माधिकारी यांनी आरोपीस चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# अडिच महिन्यापासून राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे बंद तात्काळ दुरुस्ती करा

## १० ऑक्टोबर रोजी नगरपंचायतच्या नावाने बोंबा मारो आंदोलन

पाटोदा / प्रतिनिधी पाटोदा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हॉटेल अनिकेत पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाच्या दुभाजकावरील पथदिवे अडीच महिन्यांपासून बंद असुन नवरात्र, दसरा, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तातडीने दुरुस्त करण्यात यावेत यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेकर, पाटोदा तालुका कार्याध्यक्ष शेख जावेद, पाटोदा तालुका अध्यक्ष हमीदखान पठाण यांच्या नेतृत्वाखाली दि.१०ऑक्टोबर गुरूवार रोजी पाटोदा नगरपंचायत कार्यालयासमोर " बोंबाबोंब आंदोलन" करण्यात येणार असल्याचे निवेदन मा.जिल्हाधिकारी बीड,मा. उपविभागीय अधिकारी साहेब पाटोदा,पाटोदा तहसीलदार,मा.पोलीस निरीक्षक पाटोदा यांना दिले आहे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,

पाटोदा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हॉटेल अनिकेत पर्यंत असलेल्या पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील दुभाजकांवरील पथदिवे अडीच महिन्यांपासून बंद असुन यामुळे नागरीकांना अडचणींचा सामना करावा लागत असुन संबंधित विभाग आणि कंपनीशी संपर्क साधला असता देखरेखीसाठी पाटोदा नगरपंचायतला वर्ग करण्यात आले असुन त्यांची जबाबदारी आहे असे सांगितले जाते आणि नगरपंचायत प्रशासनाला वेळोवेळी कल्पना दिली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असुन नवरात्र, दसरा दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तातडीने दुरुस्ती करण्यात यावीत या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार



कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, माहिती आधिकार कार्यकर्ता पाटोदा तालुका कार्याध्यक्ष शेख जावेद, पाटोदा तालुकाध्यक्ष हमीदखान पठाण यांच्या नेतृत्वाखाली दि.१० ऑक्टोबर गुरुवार रोजी सकाळी साडे ११ वाजता नगरपंचायत कार्यालयासमोर " बोंबा मारो आंदोलन"करण्यात येणार असल्याचे म्हटलं आहे मागणीचे निवेदन नायब तहसिलदार मा.श्रीनिवास मुळे यांना देण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष हमीदखान पठाण, कार्याध्यक्ष जावेद शेख, मोसिन भाऊ,सामाजिक कार्यकर्ते सतिष उबाळे,पत्रकार प्रतिप उबाळे,शेख जावेद आदी उपस्थित होते.

**विकासाचा गाजावाजा मात्र मुलभूत सुविधांचा अभाव:-डॉ. ढवळे**

सध्या निवडणुकीचे पडघम वाजु लागले असुन रोज कोट्यवधीच्या विकास कामाचा शुभारंभ होत असला तरी जनसामान्यांना आजही लाईट,पाणी,स्वछता आदी मुलभूत गरजेसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे दिसून येत आहे. तरी पाटोदा नगरपंचायतने याकडे लक्ष दिले नाही तर या विरोधात मोठा जन संघर्ष उभा करावा लागेल डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ८ सप्टेंबर २०२४
https://lokaarambh.com



## अग्रलेख

शिवसेनेचा बाण आणि उभाटाची दाणादाण

लोकसभेला महायुतीचे थोडे नुकसान झालेले असले तरी, शिवसेनेला मात्र मिळालेल्या यशाने सध्या शिवसेना ताजी तवानी झाली आहे राज्यात शिवसेनेचा धनुष्यबहाण हा उभाटाची मशाल व पवारांची तुतारी भिजवण्याच्या भिजवणे इतका सुसाट असल्याचे चित्र निर्माण झाल्याचे दिसत आहे आज शिवसेनेकडे 50 आमदार आणि सात खासदार आहेत मुख्यमंत्री शिंदे यांनी या बळावरच कार्यकर्त्यांचे मोठे नेटवर्क तयार करण्यात यश मिळवले आहे आणि यामध्ये मुख्यमंत्री शिंदे यांचे चिरंजीव खासदार श्रीकांत शिंदे यांचा मोठा वाटा असल्यामुळेच उभाटाचे पक्षप्रमुख नेहमी खासदार श्रीकांत यांना टार्गेट करून शिव्या घालत असल्याचे चित्र दिसत आहे परिस्थिती काहीही असली तरी, श्रीकांत शिंदे शिवसेनेचे नेटवर्क तयार करण्यात यशस्वी झालेले असल्यामुळे भाजपाच्या साथीने येथे विधानसभेत आमदारांचा आकडा वाढण्याचा आत्मविश्वास दृढ झाला आहे. दोन वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी करून बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांची शिवसेना वेगळी केली आणि ज्वलंत हिंदुत्ववादी विचारांच्या बळावर भाजपाच्या साथीने शिवसेनेला वाचवलं आणि नेमके एकनाथ शिंदेंचे ते बंड संपूर्ण महाराष्ट्राला आवडले शिंदे शिवसेनेचे हिरो झाले आणि राज्यातील तमाम नागरिकांच्या मिळालेल्या बळावर एकनाथ शिंदे नंबर वन मुख्यमंत्री म्हणून लोकप्रिय झाले आहेत आणि याच शक्तीच्या जोरावर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला विधानसभेत महा यशाची भेट मग भेट मिळणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. लोकसभा निवडणुकीनंतरच्या येशानंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा आत्मविश्वास वाढला असल्यामुळे विधानसभा निवडणुकीत अधिकार अधिक जागा शिवसेनेच्या खात्यात कशा येतील याची रचना अगोदरच पूर्ण झालेली आहे. या विहरचनेचाच एक भाग म्हणून राज्यातील अनेक सुरक्षित विधानसभा मतदारसंघात योग्य उमेदवार व व पदाधिकाऱ्यांची मजबूत बांधणी करण्यात आलेली आहे. खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडून संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढण्याची मोहीम राबवण्यात आलेली आहे शिवसेनेच्या आमदार खासदार व पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांना कधीच नव्हे तेवढे बळ देण्याचे काम मुख्यमंत्र्याकडून केले जात आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तळागाळातील लोकांपर्यंत कसे पोहोचता येईल आणि त्यांच्या व्यथा कशा दूर करता येतील याचा विचार केल्यामुळे महाराष्ट्रात इतर पक्षांपेक्षा शिवसेनेचाच बोलबाला दिसू लागला आहे. राज्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची ताकद कशी वाढेल याचा पुरेपूर विचार केंद्राने पण केलेला दिसत आहे असल्यामुळे राज्यातील अनेक योजनांसाठी केंद्राकडून निधी रुपात रसद पुरवली जात असल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलेल्या एक ना एक योजना यशस्वी होत आहेत. त्यामुळे राज्यातील प्रजा नाथांचा नाथ एकनाथ यांचे वर बेहेद दुःखच दिसत आहे राज्यातील लाडकी बहीण लाडका भाऊ लाडका शेतकरी अशा योजनांनी विरोधकांना धडकी भरल्याचे चित्र आहे. शिवसेनेला केंद्रातील भाजपच्या किचन कॅबिनेटची भरभरून मदत असली तरी राज्यात महायुतीत सामील असलेल्या अजित दादांच्या राष्ट्रवादीचा थोडासा नेहमीप्रमाणे अर्थ खात्याच्या माध्यमातून अडथळा होत असला तरी वरती निर्णय शिखरावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असल्यामुळे दादांच्या अडसराची अडकाठी शिवसेनेने बाजूला केली असल्यामुळे राज्यातील जनता शिवसेनेवर सध्या तरी मेहरबान दिसत आहे. विधानसभेच्या तोंडावर मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे आणि त्यांची शिवसेना सर्व अडथळे बाजूला करण्यात यशस्वी झाल्याचे चित्र आहे शहरी भागात तर शिवसेना चांगल्यापैकी जागा जिंकण्याच्या स्तरावर असल्याचा विश्वास दृढ झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ची निर्णय क्षमता योजना राबवण्याची राबवण्याचे हातोटी आणि शिवसेनेला मिळालेले एक खंबीर नेतृत्व पाहून राज्यातील जनता महाआघाडीच्या विरोधात बोलू लागले आहे. उद्धव ठाकरे संजय राऊत आणि सुषमाताई अंधारे यांच्या फेक वक्तव्यामुळे उभाटाच्या उद्धव ठाकरे यांनी शरद पवार यांच्या विषयीची सहानुभूतीची लाट आता पूर्णपणे विसरल्यामुळे आणि राज्यातील तीन चार जिल्ह्यात निर्माण झालेल्या मनोज जरांगे ट्रॅक्टरचे बुमऱ्यांग झाल्यामुळे विधानसभा निवडणुकीत महायुतीचाच वर्चस्वा दिसण्याचे आणि शिवसेनेचा धनुष्यबाण पुन्हा पेलण्याची संकेत मिळत आहेत

# कृषीमंत्री धनंजय मुंडेंच्या बीड जिल्ह्यातच आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंबिय शासकीय मदतीपासून वंचित;

## लाडक्या बहिणीसाठी निधी शेतकऱ्यांसाठी आखडता हातः- डॉ.गणेश ढवळे

दैनिक लोकआरंभ//

बीड:- कधी नैसर्गिक तर कधी प्रशासकीय धोरणांमुळे शेतकरी सातत्याने आर्थिक अडचणीत असुन मोठ्या प्रमाणात वाढलेला उत्पादन खर्च,खते बी -बियाणे यांच्या किंमतीत दिवसेंदिवस वाढ,शेती मालाला योग्य भाव न मिळणे.गतवर्षी जिल्ह्यात पेरण्या झाल्यानंतर पावसाने दगा दिला. काही भागात दुबार पेरणी करावी लागली. दुबार पेरणी केल्यानंतर हातातोंडाशी आलेला घास दुष्काळामुळे हिरावला.सरासरी पेक्षा पाऊस कमी पडल्याने मार्च महिन्यात विहिर, बोअरवेल,तलाव कोरडे पडल्याने शेतकऱ्यांना फळबागा मोडाव्या लागल्या. यामुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांने नैराश्यातुन आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलले.१ जानेवारी २०२४ ते ३१ सप्टेंबर २०२४ या ९ महिन्यांच्या कालावधीत १४२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यातील केवळ ६५ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत मिळाली असुन ईतर ४० कुटुंबिय शासकीय मदतीपासून वंचित आहेत. लाडक्या बहिणीसाठी निधी देणा-या सरकारने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदतीसाठी हात आखडता घेतला असुन कृषी मंत्री महोदयांच्या बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांनाच वेळेवर मदत न मिळणे लाजीरवाणी बाब असुन तातडीने चौकशी प्रलंबित प्रकरणे मार्गी लाऊन मदत देण्यात यावी.तसेच उच्च न्यायालयाचे १५ दिवसात मदत मिळणे बंधनकारक असताना सहा महिने मदत न मिळाल्याने प्रकरणे प्रलंबित ठेवण्यास जबाबदार आधिका-यांवर उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना प्रकरणात प्रशासकीय कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली




आज दि.०७ आक्टोबर सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड अविनाश पाठक यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, कृषीमंत्री धनंजय मुंडे, विभागीय आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात माहिती रामनाथ खोड,शेख युनुस,सुदाम तांदळे,शेख मुबीन, शेख मुस्ताक आदी सहभागी झाले होते.

बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२४ ते ३१ सप्टेंबर २०२४ या मागील ९ महिन्यांच्या कालावधीत जानेवारी मध्ये १८, फेब्रुवारी मध्ये १४ , मार्च मध्ये १२ , एप्रिल मध्ये १३,मे मध्ये १३ , जुन मध्ये २९, जुलै मध्ये १४ आगस्ट मध्ये १५ , सप्टेंबर मध्ये १५ अशा एकुण ९ महिन्यात १४२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.यातील १७ शेतकरी मदतीस अपात्र ठरले असुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे प्रस्ताव चौकशीसाठी अद्याप प्रलंबित आहेत तर १०५ शेतकरी शासनाच्या एक लाख रुपयांच्या मदतीस पात्र आहेत. मात्र त्यातील केवळ ६५ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाच्या १ लाख रुपये मदतीचा निधी मिळाला आहे. आणि ४० आत्महत्याग्रस्त कुटुंबिय मदतीपासून वंचित आहेत.त्यामुळे चौकशी अभावी मदतीपासून प्रलंबित प्रकरणे तातडीने मार्गी लाऊन तातडीने मदत देण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

उच्च न्यायालयाची अवमानना मदतीस विलंब प्रकरणी जबाबदारी शासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करा:- डॉ.ढवळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना १५ दिवसांच्या आत मदत मिळणे बंधनकारक असल्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश असताना तातडीने मदत न मिळणे,वैद्यकीय

### उच्च न्यायालयाची अवमानना मदतीस विलंब प्रकरणी जबाबदारी शासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करा:- डॉ.ढवळे

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना १५ दिवसांच्या आत मदत मिळणे बंधनकारक असल्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश असताना तातडीने मदत न मिळणे,वैद्यकीय अहवाल तातडीने सादर न करणे व प्रकरणात दिरंगाई केल्याबद्दल पोलिस निरीक्षक तसेच तहसिल प्रशासनातील अधिकाऱ्यांवर उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना असुन चौकशी अभावी प्रलंबित प्रकरणात जबाबदार पोलिस प्रशासन तसेच तहसिल प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली आहे.

# ज्ञानदानाच्या नावाखाली संस्थाचालक व अधिका-यांनी संगनमताने चालवलेला शिक्षणाचा काळाबाजार रोखण्यासाठी शिक्षण क्षेत्र विना पासवर्ड ऑनलाईन करा.

संभाजीनगर : शिक्षणासारखा पवित्र क्षेत्रात अधिकारी व संस्थाचालकांच्या संगनमताने काळाकुट्ट कारभार व आर्थिक भ्रष्टाचार मोकळा असतानाच जुन्या नियुक्त्या दाखवून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बोगस भरती आणि बोगस विद्यार्थी संख्या नोंदवून शासनाच्या तिजोरीवर कोट्यावधींचे दरोडे टाकण्याचे काम राज्यभरात करण्यात येत असून, ही परिस्थिती थांबवण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्र वाचवण्यासाठी संपूर्ण शिक्षण क्षेत्राच्या हालचाली विना पासवर्ड ऑनलाईन करण्याची मागणी ब्रिजमोहन मिश्रा यांनी शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे एका निवेदनातून केली होती परंतु शासनाने याबाबत काहीच कारवाई न केल्याने याबाबतची जनहित याचिका संभाजीनगर खंडपीठात दाखल करून घेण्यात आल्याने संस्थाचालकामध्ये एकच खळबळ उडाली आहे.

याबाबतची निवेदनात नमूद केलेली माहिती अशी की, शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राचे बाजारीकरण झालेले असून संस्थाचालक आणि शिक्षणाधिकारी ते शिक्षण उपसंचालक हे संगणमताने शासन व जनतेची लय लूट करत आहेत. मोठमोठ्या लाच घेऊन अधिकारी हे कर्मचाऱ्यांच्या नियमबाह्य नियुक्त्या करत आहेत तर अनेक संस्था चालकाने मागच्या तारखा दाखवून कर्मचाऱ्यांचे वेतन व शासनाकडून कोट्यावधींची अनुदान लाटण्याची प्रकरणे समोर आलेली आहेत. बोगस विद्यार्थी दाखवून कर्मचाऱ्यांच्या मागील तारखेत नियुक्ती केल्याचे दाखवून लाखोंची अनुदान उचलण्याची अनेक प्रकरणी समोर आल्यानंतर शासनाने दिनांक 3 ते 5 ऑक्टोबर 20 11 मध्ये पडताळणी मोहीम राबवून राज्यातील 2600 शाळांना दोषी ठरवले होते आणि 20 लाख 70 हजार 520 विद्यार्थी बोगस असल्याचा अहवाल दिला होता. आधार नोंदणी मध्ये देखील 40 लाखांच्यावर विद्यार्थी बोगस असल्याचे उघड झाले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. धाराशिव जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी प्रवीण गेडाम यांनी सन 20 11 मध्ये जिल्ह्यातील शिक्षकांच्या नियुक्तींची विशेष चौकशी करून जवळजवळ 99% शिक्षकांच्या भरती बोगस असल्याचा सविस्तर अहवाल दिला होता. संपूर्ण राज्यभरात ही स्थिती असल्याचे उघड झालेले असताना देखील शालेय शिक्षण विभाग हा संस्थाचालक व कर्मचाऱ्यावर काहीच कारवाई करत नाही.असे निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे. निवेदन निवेदनात पुढे असे नमूद करण्यात आले आहे की शिक्षण क्षेत्रातला प्रस्तुत भ्रष्टाचार व गैरकारभार थांबवण्यासाठी शासनाने योग्य पाऊल उचलून संस्थेतील मागील तारखेची नोंद करून केलेली भरती विना पासवर्ड ऑनलाईन करावी तसेच भरतीला मान्यता देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची प्रोसेस ही विना पासवर्ड ऑनलाईन करण्याची शक्ती करण्यात यावी. भरती प्रक्रियेची व मुख्याध्यापकांची स्वतंत्र वेबसाईट तयार करण्यात यावी व त्या वेबसाईटवर सर्व माहिती व नोंद करण्यात यावी. प्रत्येक पहिली ते पाचवीच्या शाळेत बायोमेट्रिक मशीन बसवण्यात यावेत, तसेच प्रत्येक शाळेच्या प्रत्येक व्हिजनवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. अशा अनेक मागण्या निवेदनातून केलेल्या आहेत.आणि याच निवेदनावर संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली असून अधिकारी व संस्थाचालिक यांचे संगनमताने राज्यभरात चालू असलेला काळाबाजार उघड होणार असल्याने राज्याच्या शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

## महाराष्ट्र सरकारची तिजोरी बिकट अवस्थेत? बड्या नेत्याच्या दाव्याने राजकारणात चर्चांना उधाण

महाराष्ट्र सरकारची तिजोरी बिकट अवस्थेत असल्याचा दावा करत सरकारने सव्वा लाख कोटी कर्जासाठी आरबीआयकडे अर्ज केल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला आहे. विविध योजनांच्या घोषणा आणि लाडकी बहीण योजनेसाठीच्या तरतुदीवरुन सत्ताधारी-विरोधकांमध्ये दावे प्रतिदावे होत आहेत. खासदार संजय राऊत यांनी सुद्धा मध्य प्रदेशात भाजपने सुरु केलेली लाडकी बहीण योजना बंद पडल्याचा आरोप करत योजनेवर प्रश्न केलाय. मात्र अर्थमंत्री अजित पवारांनी तिघांचे दावे फेटाळत राज्याचं अर्थचक्र अजून वेगान चालण्याची ग्वाही दिलीय आहे. अर्थमंत्री अजित पवारांनी तिजोरी भक्कम असल्याचा दावा केला असला तरी काही दिवसांपूर्वी खुद्द केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनीच लाडक्या बहीण योजनेसाठी इतर क्षेत्रातल्या सबसिड्या अडकल्याचं विधान करुन सरकारची कोंडी केली होती. याशिवाय समोर आलेल्या काही बातम्यांनुसार अनेक सरकारी निर्णय वित्त विभागाच्या नकारात्मक शेऱ्यानंतरही घेण्यात आले.

काही दिवसांपूर्वी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंच्या संस्थेला शासकीय भूखंड देण्यात आला, माहितीनुसार या निर्णयास वित्त आणि महसूलचा विरोध होता. त्याआधी भाजपच्या प्रवीण दरेकर अध्यक्ष असलेल्या मुंबै बँकेला भूखंड दिला गेला. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, वित्तविभागाचा शेरा डावलून क्रीडा संकुलांसाठी 1781 कोटींना मंजुरी दिली गेली. वित्त विभागाच्याच शेरा डावलूनच भाजपचे गिरीश महाजन निकटवर्तीयांच्या श्यामप्रसाद मुखर्जी सहकारी सूतगिरणीला 32 कोटींची सरकारी मदत देण्यात आल्याचं समोर आलंय.

# दिवंगत ज्येष्ठ कामगार नेते शाम म्हात्रे साहेब यांची ६९ वी जयंती उत्साहात साजरी.

उरण दि ७(विठ्ठल ममताबादे ) रविवार दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे दिवंगत जेष्ठ कामगार नेते शाम म्हात्रे साहेब यांची ६९ वी जयंती साजरी करण्यात आली. जयंती निमित्त अनेक नेते मंडळी यांनी या कार्यक्रमात शाम म्हात्रे साहेबांच्या आठवणींना उजाळा देत अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच शाम म्हात्रे यांच्या जयंती निमित्त शालेय विद्यार्थी तसेच महिलांसाठी २८ सप्टेंबर रोजी विविध स्पर्धांचे देखील आयोजन केले होते. त्या स्पर्धांचे बक्षीस समारंभ ६ ऑक्टोबर रोजी शाम म्हात्रे साहेब यांच्या जयंतीदिनी करण्यात आले त्यामध्ये निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक नियती पाटील , हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम क्रमांक स्वरदा स्वप्नील उपाध्ये काव्य लेखन स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अनिता सुधीर राजदेव,पाककला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अरुणा चिरपे,चित्रकला स्पर्धेमध्ये कशिष गणेश तिखे तसेच वकृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक रेखा भूषण घारे आणि एकपात्री - दविपात्री अभिनय स्पर्धेमध्ये मानसी प्रकाश मुंढे हे सर्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले आहेत. या स्पर्धांचे बक्षीस वितरण कोकण श्रमिक संघाचे अध्यक्ष संजय वढावकर , आगरी शिक्षण संस्थेचे जेष्ठ संचालक जे डी तांडेल तसेच कामगार नेत्या श्रुती शाम म्हात्रे ह्यांच्या हस्ते करण्यात आले तसेच ज्यांनी ह्या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला त्या सर्व स्पर्धकांना सन्मानपत्र देण्यात आले .या कार्यक्रमावेळी पनवेल मधील महिला पत्रकारीतेत सक्षम रित्या काम करणाऱ्या रुपालीताई शिंदे यांना स्त्री शक्ती सन्मान पुरस्कार २०२४ देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच आलेल्या पाहुण्यांसाठी शिवभक्ती भजन मंडळ कर्जत यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमावेळी सुदाम पाटील कार्याध्यक्ष, पनवेल जिल्हा काँग्रेस कमिटी, हेमराज म्हात्रे अध्यक्ष युवक काँग्रेस कमिटी, पंकज भगत मुख्याध्यापक आगरी शिक्षण संस्था , नाना म्हात्रे माजी अध्यक्ष खालापूर काँग्रेस कमिटी , आर डी पाटील लिडर एच आय एल कंपनी, भरत जाधव अध्यक्ष पनवेल तालुका शिवसेना तसेच कोकण श्रमिक संघटनेचे सर्व तालुका अध्यक्ष व कामगार यांनी देखील या कार्यक्रमात आपली उपस्थिती दर्शविली होती. या कार्यक्रमा वेळी शाम म्हात्रे साहेबांच्या आठवणींना उजाळा देत असताना सर्व मान्यवरांनी म्हात्रे साहेबांचे कार्य ज्या प्रमाणे श्रुती म्हात्रे चालवत आहेत तर येत्या दिवसांमध्ये श्रुती म्हात्रे यांना विधानसभेमध्ये पाहण्याची इच्छा देखील आलेल्या मान्यवरांनी व्यक्त केली. या प्रसंगी श्रुती म्हात्रे यांनी शाम म्हात्रे साहेबांच्या संघर्षमय जीवनाचा आढावा देत दी बा पाटील साहेब व शाम म्हात्रे साहेब यांच्या विचारांना धरून काम करताना प्रसंगी कुठे अडचणी येत असताना जयंती साजरी करीत असताना पुन्हा काम करण्याची स्पूर्ती मिळते असे देखील या ठिकाणी प्रामुख्याने सांगितले. या प्रसंगी कामगार वर्गानी देखील शाम म्हात्रे साहेबांप्रमानेच श्रुती म्हात्रे देखील काम करत आहेत अश्या भावना व्यक्त करत असताना श्रुती म्हात्रे यांनी हे यश एकट्याचे नाही तर कोकण श्रमिक संघटनेच्या सर्व सभासदांचे आहे असे देखील या ठिकाणी आवर्जून सांगितले . तसेच कोकण श्रमिक संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण कामगार वर्गाला शुभेच्छा देत उपस्थितांचे आभार मानले .तसेच सोमवार दिनांक ७ ऑक्टोबर रोजी आगरी शिक्षण संस्था शाळेत व गणेश मंदिर मार्केट येथे देखील सकाळी दिवंगत जेष्ठ कामगार नेते शाम म्हात्रे यांची जयंती साजरी करण्यात आली.

# मंत्री गुलाबराव पाटील यांनी जळगावात भर सभेत भाजप विरुद्ध व्यक्त केली नाराजी

मंत्री गुलाबराव पाटीव यांनी जळगावात भर सभेत भाजप विरुद्ध जाहीरपणे नाराजी व्यक्त केली आहे. शिवसेनेचे आमदार किशोर आप्पा पाटील यांनी आयोजित केलेल्या भव्य निर्धार मेळाव्याला भाजपचा एकही मंत्री किंवा आमदार, खासदार उपस्थित नव्हते. भाजपचे स्थानिक कार्यकर्ते आणि पदाधिकारी देखील या मेळाव्यास उपस्थित नव्हते. या कार्यक्रमाचे मंत्री गिरीश महाजन, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, त्यांच्यासह जिल्ह्यातील आमदार खासदारांना निमंत्रण देण्यात आलेले होते. मात्र या सर्वांनी या निर्धार मेळाव्याकडे पाठ फिरवल्याने भर सभेमध्ये मंत्री गुलाबराव पाटील यांनी खंत व्यक्ती केली. “मी निश्चितपणाने भाषणात देखील या संदर्भात बोललो आहे. वरिष्ठांकडे आजच्या मेळाव्यात जे घडलं या गोष्टी मी मांडणार आहे. युतीमध्ये अशा गोष्टी घडता कामा नयेत. याचा परिणाम हा संपूर्ण महाराष्ट्रावर होईल. उद्याच्या दिवशी मुंबईला कॅबिनेट मिटींग आहे. त्या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री गिरीश महाजन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर हा प्रकार आम्ही मांडणार आहोत”, अशी प्रतिक्रिया गुलाबराव पाटील यांनी दिली.

“लोकसभा निवडणुकीत आपण एकसंघ होतो म्हणून विपरीत वातावरण असताना सुद्धा दोघं सीट आपल्या निवडून आल्या. त्याचप्रमाणे जर आपण विधानसभेत एकसंघ राहिलो तर जळगाव जिल्ह्यातील 11 पैकी 11 जागा निवडून येऊ शकतात. मात्र आपल्यात फूट असणं हे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नुकसानीचे आहे”, अशी भूमिका गुलाबराव पाटील यांनी मांडली.

गुलाबराव पाटील यांनी भाषणात काय खंत व्यक्त केली?

“लोकसभेच्या वेळेस भाजपच्या नेत्या स्मिता वाघ उमेदवार नव्हत्या. आम्ही स्वतः उमेदवार होतो. आम्ही हेच सांगायचं, स्मिताताई खासदार होणार नाही नरेंद्र मोदी हे पंतप्रधान होणार आहेत आणि त्यांच्या करता मत द्यायचा हा जोगवा आम्ही मागितला. माझ्या मतदारसंघामध्ये 63 हजाराचा लीड दिला. किशोर आप्पा पाटलांच्या मतदारसंघात लीड दिला. आज भाजपच्या मंडळीला बोलावलेलं असताना देखील आमची भाजपची मंडळी आज आली नाही. याच्यावर आम्ही मार्ग काढू, विनंती करू”, असं गुलाबराव पाटील म्हणाले.



“त्यावेळेस आम्ही नवरदेववाले होतो. भाजपवाले नवरी वाले होते. आता आम्ही नवरीवाले आहोत. भाजपवाले नवरदेव आले आहेत”, असं गुलाबराव पाटील म्हणाले. कारण नवरदेव वाल्यांना किंमत असते तेव्हा लोकसभेला गुलाबराव पाटलांनी भाजपचा प्रचार केला. आज विधानसभा निवडणुकीत गुलाबराव पाटलाचं म्हणणं आहे की, आम्ही नवरीवाले आहोत. त्यामुळे आता भाजप नवरदेववाले असल्यामुळे त्यांना किंमत आहे. त्यामुळे निश्चितपणाने आम्ही यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू, असंही गुलाबराव पाटील आपल्या भाषणात म्हणाले.

# डॉ.योगेश क्षीरसागरांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शेकडो युवकांच्या हाती घड्याळ

## बीडमध्ये निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात इनकमिंग

### ना.अजितदादा, धनुभाऊंच्या नेतृत्वामुळे युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे ओढा





बीड (प्रतिनिधी) दि.७ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पक्ष प्रवेश केल्यापासून पायाला भिंगरी बांधून मतदारसंघ पिंजून काढला आहे. त्यांचा जनसंपर्क, प्रभावी कार्यपद्धती पाहून विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते त्यांना साथ देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत. बीड तालुक्यातील अंजनवती येथे दौऱ्यावर असताना डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत सदस्य सूर्यभान कार्डिले यांनी पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी पंचायत समिती सभापती काकासाहेब जोगदंड, सरपंच बालासाहेब जाधव, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, पांडुरंग येडे, अभिमान येडे, सुभाष येडे, अशोक येडे, समीर शेख, फुलचंद येडे, श्रीराम घरत, सुनील घरत, माजेद कुरेशी, मिलिंद ठोकळ, दीपक जगदाळे, शिवाजी घरत, आसाराम घरत, राजेभाऊ क्षीरसागर उपस्थित होते. भाळवणी येथील विनोद बहिरवाळ, भारत डोंगर, संतोष मुळे, भाऊ मस्के, जयराम मस्के, अशोक बहिरवाळ, महेश चव्हाण, बिभीषण दहे, बाळू दहे, गणेश बहिरवाळ, शाम बहिरवाळ, अशोक दहे, किरण चव्हाण, वाघमारे, विलास बहिरवाळ, महादेव मुळे, संदीप मुळे, ऋषिकेश बहिरवाळ, रोहित बहिरवाळ, शुभम बहिरवाळ, सूरज चव्हाण, ओंकार बहिरवाळ, प्रमोद बहिरवाळ, सोमीनाथ दहे, बिभीषण दहे यांच्यासह अनेक तरुणांनी प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, अमर विद्यागर आदी उपस्थित होते. शहरातील कागदी वेस, अजिजपुरा भागातील रवी वडमारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रवेश केला. याप्रसंगी नगरसेवक मुन्ना इनामदार, शुभम धूत, बिलाल शेख, गजानन जवकर, शैलेश गिरी, ज्ञानेश्वर राऊत, किरण बेदरे, डॉ.शेख शकील, शुभम वीर आदींची उपस्थिती होती. आहेर वडगाव येथील शिवाजी रोहिटे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी बालासाहेब काटे, गोरख रोहिटे, बाळू रोहिटे, पिंटू सपकाळ, नवनाथ रोहिटे, कृष्णा सोळूंके, सचिन सोळूंके, जावेद शेख, अजित डोंगरे, धनंजय राऊत, मुकिंद रोहिटे, राजाभाऊ रांजवन, शहाजी कदम, लखन रोहिटे, सुदाम रोहिटे, निवेदक बाबासाहेब रांजवन यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर इनकमिंग होत असून विरोधी पक्षातील शेकडो युवक कार्यकर्ते, पदाधिकारी ना.अजितदादा, धनुभाऊंच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये डॉ.योगेशभैय्यांच्या नेतृत्वाखाली हाती ‘घड्याळ’ बांधून घेत आहेत. त्यामुळे बीड विधानसभा मतदारसंघात पक्षाची ताकद वाढली आहे.

### डॉ.क्षीरसागरांचा संघटन मजबूत करण्यावर भर

ना.अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी एक वर्षापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. तेव्हापासून पक्षाची सदस्य नोंदणी, विविध पद नियुक्त्या, पक्षाचे प्रचार व प्रसाराचे कार्यक्रम राबविणे अशा माध्यमातून निष्ठेने काम करत संघटन मजबूत करण्यावर भर दिला आहे. विकासाचे व्हिजन, थेट जनसंपर्क, तत्पर यंत्रणेमुळे बीड विधानसभा मतदारसंघात डॉ.योगेश यांच्या नेतृत्वावर जनतेचा अधिक विश्वास असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यांचा संघटन मजबूत करण्यावर कायम भर राहिला आहे.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिनात एकुण .03 अर्ज प्राप्त


बीड, दि. 7 :- जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये लोकशाही दिनाचे 03 अर्ज प्राप्त झाले. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अदित्य जीवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुयवंशी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक संपन्न



बीड, दि 7:- जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड तथा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-याविरुध्द प्राप्त होणा-या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने प्राप्त तक्रारीची पडताळणी करुन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी संबधित तक्रारीविषयी प्राप्त तक्रारीला पत्राव्दारे उत्तरे देण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अदित्य जीवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुयवंशी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी तसेच संबधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# दखल तक्रारीची आणि प्रसारमाध्यमांची ; धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील भगदाड दुसऱ्याच दिवशी बुजविण्यात आले:- डॉ.गणेश ढवळे



बीड:-( दि.७ ) बीड तालुक्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ धुळे ते सोलापूर या महामार्गावरील मांजरसुभा येथील बीडकडे जाणारा उड्डाणपूल संपतो त्याठिकाणी ३ मोठमोठाले भगदाड पडलेले होते.त्यामुळे रात्री अपरात्री अपघाताची दाट शक्यता ओळखून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी लेखी तक्रार ईमेल द्वारे रविवार रोजी नितिनजी गडकरी गडकरी , प्रकल्प संचालक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांना केली होती. यासंदर्भात विविध सायं दैनिके तसेच आज सोमवार रोजी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या.तक्रारीची आणि प्रसारमाध्यमांची दखल घेऊन आजच आयआरबी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांमार्फत तिन्ही भगदाड बुजविण्यात आले.त्यामुळे भविष्यात संभाव्य अपघात टळण्यास मदत झाली आहे.

# केज पोलीसाचे मटका जुगार अड्ड्यावर छापे.

केज: केज शहर व परिसरात अवैध धंद्यांनी उच्छाद मांडला असून, याला कारण केच पोलिसांचे दुर्लक्ष असल्याचे दिसत असले तरी, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केज शहरात तीन ठिकाणी ऑनलाइन चक्री, फन गेम व मटका अड्ड्यावर छापे मारून जुगाराच्या साहित्यासह १ लाख ५० हजार ९०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी सात जणांविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे फौजदार हनुमान खेडकर, जमादार कैलास ठोंबरे, भागवत शेलार, युनूस बागवान यांच्या पथकाने ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास फारुखी कॉम्प्लेक्समध्ये ऑनलाइन चक्री जुगारावर छापा मारून या जुगाराच्या चित्राचे दोन चार्ट, लॅपटॉप, एलईडी टीव्ही व नगदी २२ हजार ६५० रुपये असा ७२ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी सय्यद आसेफ युसुफ, सय्यद गज्जु उस्मान (दोघे रा. इस्लामपुरा, केज) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या पथकाने बसस्टँडजवळील ढोरमारे यांच्या गाळ्यात छापा मारून एलईडी स्क्रीनवर ऑनलाईन फन गेम नावाचा जुगार खेळताना मिळून आले. पोलिसांनी बॅनर, टीव्ही स्क्रीन, मोबाईल, नगदी ५ हजार ४४० असा एकूण ४० हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून याप्रकरणी सुभाष उत्तरेश्वर जाधव (रा. मर्कज मस्जीद जवळ, केज) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तिसऱ्या कारवाईत पथकाने इंगळे वस्ती शिवारात मटका अड्ड्यावर छापा मारून तिघांना पकडले. त्यांच्याकडील मटका जुगाराचे साहित्य, नगदी ४ ४ हजार २७० रुपये, मोबाईल असा ३७ हजार ८१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी ईस्माईल मसीयोद्दिन ईनामदार (रा. रोजा मोहल्ला, केज), संकेत भारत जाधव (रा. जैन कॉलनी, अंबाजोगाई), प्रमोद प्रदिप सत्वधर (रा., केज), गणेश सुधीर खराडे (रा. मंगळवार पेठ, केज) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# दिव्यातील शाळेत नवरात्री निमित्त रास गरबा व दांडीया.



संतोष पडवळ - प्रतिनिधी ठाणे, दिवा ता ७ ऑक्टो : मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा त्यांच्यातील कलाकौशल्य विकसित व्हावे हा प्रत्येक शाळेचा उद्देश असतो. हाच उद्देश साध्य करण्यासाठी आर एल पी हायस्कूलमध्ये सोमवार, ७ ऑक्टोबर रोजी शालेय लहान मुलांसाठी सांस्कृतिक उपक्रम म्हणुन रास गरबा आणि दांडिया नृत्य याचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास मुलांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. मुलामुलींनी अतिशय उत्तम प्रकारे गरबा नृत्य सादर केले. अभ्यासाव्यतिरिक्त मुलांना विरंगुळा मिळावा हाच उद्देश होता. लहान मुलांसाठी खास आकर्षण म्हणून वाघाचा पोशाख घालून मुलांना उभे केले होते. तो वाघ बघून लहान मुले अतिशय आनंदीत झाली. सदर कार्यक्रमास संस्थेचे मुख्य विश्वस्त राजेश पांडे, व इतर विश्वस्त मनोज पांडे, संतोष पांडे, प्रमोद पांडे उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पकला जैस्वार व शाळेतील इतर सर्व शिक्षिका व इतर शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनीच रास गरबा आणि दांडिया य कार्यक्रमाचा आनंद घेतला आणि अतिशय उत्साहात हा कार्यक्रम पार पडला.

# छत्रपती शिवरायांची प्रतिमा स्वीकारताना राहुल गांधींनी केलं असं काही



आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकीय घडामोडी वेगात सुरु आहेत. देशातील अनेक वरिष्ठ नेत्यांकडून सातत्याने महाराष्ट्राचे दौरे सुरु आहेत. त्यातच आज काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांचा कोल्हापूर दौरा पार पडला. यावेळी त्यांनी कसबा बावडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केली. या सोहळ्याला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, कोल्हापूरचे खासदार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती, विधान परिषद सदस्य सतेज पाटील यांच्यासह प्रदेश काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी हजेरी लावली. यावेळी राहुल गांधी यांच्या एका कृतीने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. कोल्हापुरातील कसबा बावडा या ठिकाणी असलेल्या भगवा चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला आहे. आमदार सतेज पाटील यांच्या संकल्पनेतून हा बहुशस्त्रधारी भव्य पुतळा साकारला आहे. या पुतळ्याचे अनावरण काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केले. या अनावरण सोहळ्यानंतर त्यांना या पुतळ्याची एक छोटी प्रतिमा भेट म्हणून देण्यात आली. ही प्रतिमा स्वीकारताना राहुल गांधींनी भर सभेदरम्यान त्यांच्या पायातील बूट बाजूला काढून ठेवले. याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओवर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रतिक्रिया दिली.

# भविष्यात प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाचे महत्व वाढणार – एस. एम. देशमुख




गेवराई / प्रतिनिधी समाजात घडणाऱ्या चुकीच्या गोष्टी आणि राज्यकर्त्यांच्या विरोधात लोकहितासाठी भूमिका मांडण्याचे काम पत्रकारांचे आहे यासाठी प्रिंट मीडिया जितका महत्त्वाचा आहे तितकाच महत्त्वाचा भविष्यात डिजिटल मीडिया असणार आहे. त्यामुळे पत्रकारांनी डिजिटल मीडियामध्ये अधिक सक्रिय व्हावे असे आवाहन अभा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी केले आहे. सत्ताधाऱ्यांचे चुकत असेल तर ते चूक म्हणण्याची भूमिका पत्रकारांनी ठेवावी आणि जनतेचा आवाज होऊन प्रिंट मीडिया आणि डिजिटल मीडियाने काम करावे असे आवाहन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे. गेवराई येथील शासकीय विश्रामगृह येथे दिनांक 6 ऑक्टोबर 2024 रोजी अभा मराठी पत्रकार परिषदेची सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या वतीने मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या सदस्यांचा मेळावा आणि नूतन पदाधिकारी सत्कार सोहळ्याची आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कार्यक्रमा अध्यक्ष म्हणून एस एम देशमुख बोलत होते. या कार्यक्रमास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल सोळुंके, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, संपादक सर्वोत्तम गावस्कर, राज्य सरकारच्या अधिस्वीकृती समितीचे सदस्य अनिल महाजन, डिजिटल मीडिया जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, डिजिटल मीडिया परिषदेचे तालुकाध्यक्ष अविनाश इंगावले, मराठा पत्रकार परिषद जिल्हा सचिव राजेंद्र बरकसे, जिल्हाउपाध्यक्ष जुनेद बागवान यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डिजिटल मीडिया परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अनिल वाघमारे यांचा उपस्थित मान्यवर आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर डिजिटल मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी दिनकर शिंदे यांची निवड जाहीर करून सत्कार करण्यात आला. ल यावेळी बोलताना एस एम देशमुख म्हणाले की, काळ बदलत आहे ला. तशा पद्धतीने पत्रकारांनीही आपली भूमिका बदलणे गरजेचे आहे. आजच ळी इलेक्ट्रॉनिक मीडियाने आपले स्वतंत्र यूट्यूब चैनल सुरु केले आहेत

# स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या सांस्कृतिक सभागृहाच्या पायाभरणीच्या कार्यक्रमासाठी जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने दिल्या शुभेच्छा.



केज / प्रतिनिधी केज शहरातील अनेक वर्षापासून रखडलेले आमच्या स्वप्नातलं स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे सांस्कृतिक सभागृहाचे काम गेल्या दोन महिन्यापासून काम सुरू झाले असून या कामाच्या पायाभरणीचे भूमिपूजन आमदार नमिताताई मुदडा यांच्या हस्ते होणार आहे तरी या कार्यक्रमासाठी केज नगरपंचायत च्या वतीने व नगराध्यक्षा यांच्या वतीने जनविकास परिवर्तन आघाडीचे सर्वेसर्वा हरुणभाई इनामदार यांनी संगीताताई ठोंबरे तसेच या कामासाठी ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले अशा सर्वांचे मनापासून आभार मानले आहेत व दोन्ही आजी माजी आमदारांना शुभेच्छा दिल्या आहेत. पुढे बोलताना हारुणभाई इनामदार म्हणाले की,या वास्तूचे भुमीपुजन पंकजाताई मुंडे व प्रीतमताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात यावे अशी आमची इच्छा होती परंतु सत्तेपुढे शाहणपन चालत नाही. यावर आमच्या प्रतिनिधीने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना हारूनभाई इनामदार म्हणले की, या कार्यक्रमाचे प्रोटोकॉल प्रमाणे निमंत्रण द्यायला पाहिजे परंतु अद्याप आम्हाला निमंत्रण मिळालेले नसल्याने आम्ही उद्याच्या कार्यक्रमासाठी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब आमच्या स्वप्नातले सांस्कृतिक सभागृह होत असल्याने आमदार नमिता ताई यांना शुभेच्छा आहेत.

# रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी आयोजित खेळ पैठणीच्या खेळात शेवंताची उपस्थिती !



यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था शेलघर व रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा.श्री.महेंद्रशेठ घरत यांच्या सौजन्याने आयोजित उलवे नोड येथील नवरात्र उत्सवात दिनांक ६ ऑक्टोबर रोजी महिलांसाठी खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या खेळात शंभराहून अधिक महिलांनी सहभाग घेतला. खेळ पैठणीचा खेळात मुख्य आकर्षक होते रात्रीस खेळ चाले या मालिकेतील शेवंता म्हणजेच अपूर्वा नेमळेकर यांची उपस्थिती. अपूर्वा नेमळेकर फक्त उपस्थित राहिल्या नाहीत तर त्यांनी गरबा नृत्याचा आस्वाद घेतला व ठेका धरला. त्यांच्या सहभागाने महिलांचा उत्साह द्विगुणीत झाला. त्यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाच्या पैठणीच्या मानकरी सौ.मोनाली भिलारे, द्वितीय क्रमांक सौ.पायल घाडगे, तृतीय क्रमांक सौ. संचिता कोळी तर चतुर्थ क्रमांकाच्या मानकरी छाया शेट्टी यांना मानाच्या पैठण्या देण्यात आल्या.तर लकी ड्रॉ द्वारे चार भाग्यवान महिलांना सेमी पैठण्या देण्यात आल्या. काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या संस्थेमार्फत अतिशय सुरेख कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.उलवे नोड मधील महिला वर्ग पावसाची तमा न बाळगता या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

मंगळवार ८ सप्टेंबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4



# मुख्यमंत्री बहीण लाडकी! विरोधकाना भरली धडकी!!

## लाडकी बहीण योजनेच्या लाभाची रक्कम टप्प्या-टप्प्याने वाढविणार- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

छत्रपती संभाजीनगर: स्त्री ही आबला आहे,स्त्रीला सबला बनवले पाहिजे, तिला कायद्याने पुरुष आहेत तेच अधिकार दिले पाहिजेत आणि, सर्व क्षेत्रात स्त्रीला 50 टक्के आरक्षण देऊन महिलांचा सन्मान केला पाहिजे: असे गेल्या पन्नास वर्षापासून सर्वच पक्षांकडून टाहो फोडला जात होता परंतु, प्रत्यक्ष कृती कोणीच केलेले नसतानाच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी मात्र महायुतीच्या माध्यमातून लाडकी बहीण योजना कार्यविनित करून महिला सक्षमीकरणासाठी मोठा हातभार लावला असल्याची राज्यभरातून लहर पसरली असतानाच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मात्र मविआ मधील घटक पक्षांना मात्र लाडक्या बहिणीची धडकी भरल्याचे चित्र दिसू लागले आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी महायुतीला पूरक ठरणारे आणि विरोधकांना धडकी भरवणारे महिला सशक्तिकरण अभियान संपूर्ण राज्यभर राबवला आहे. त्याचाच एक भाग म्हणून मराठवाड्याची राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संभाजीनगर मध्ये नुकतेच महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री लाडके बहिण योजना लाभार्थी सन्मान व राज्यस्तरीय योजनांचे लोकार्पण कार्यक्रम संपन्न झाला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही नेहमी सुरु रहावी यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात आली असून ही योजना बंद तर पडणार नाहीच उलट लाभाची रक्कम ही टप्प्या टप्प्याने वाढविण्यात येईल,असा शब्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे आपल्या लाडक्या बहिणींना दिला. छत्रपती संभाजीनगर येथे खडकेश्वर परिसरात मराठवाडा सांस्कृतिक मंडळ मैदान येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत 'मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान' आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा पार पडला. पालकमंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार सर्वश्री सतिष चव्हाण, विक्रम काळे, प्रदीप जयस्वाल, रमेश बोरनारे, ऊर्जा विभागाच्या अप्पर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महिला व बालविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. अनुपकुमार यादव, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे, जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड उपस्थित होते.



लाडकी बहिण योजनेचे पंतप्रधानांकडून कौतुक

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरु केली आहे. या योजनेतून महिलांना दरमहा दीड हजार रुपयांचा लाभ दिला जात आहे. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे एकत्रित तीन हजार रुपये महिलांच्या खात्यात सुरु करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. यापूर्वी तीन महिन्यांचे साडेचार हजार रुपये महिलांच्या खात्यात जमा केले आहेत. गरिबीची जाणीव असल्याने या सरकारने गोरगरीब महिलांच्या संसाराला मदत करण्यासाठी ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला. सुमारे अडीच कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. या योजनेतून मिळणाऱ्या रक्कमेतून काही महिलांनी छोटे-छोटे व्यवसाय सुरु केले असून त्यामधून रोजगार आणि आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण झाले आहे. या महिला स्वतःच्या पायावर उभा राहिल्या आहेत, असेही ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे कौतुक केले आहे. महिला सक्षमीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्राचे कार्य हे देशासाठी दिशादर्शक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबद्दल राज्य शासनाचे कौतुक केले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी पुरेशी तरतूद केली असून ही योजना बंद होणार नाही, उलट भविष्यात लाभाची रक्कम टप्प्या-टप्प्याने वाढविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

कृषीपंपांसाठी शून्य वीज बिलामुळे शेतकऱ्यांना लाभ

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शेतीसाठी साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. जवळपास ४५ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ झाला असून त्यांचे वीज बिल शून्य झाले आहे. युवकांना रोजगाराचे प्रशिक्षण देण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु केली. यामधून प्रशिक्षण काळात त्यांना सहा हजार ते दहा हजार रुपये विद्यावेतन दिले जात आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत असून यामधून उभ्या राहणाऱ्या उद्योगांमुळे राज्याच्या विकासाला गती मिळेल. रोजगार निर्मिती होईल. मुख्यमंत्री वयोश्री योजनेतून वयोवृद्ध नागरिकांना विविध उपकरणे खरेदीसाठी तीन हजार रुपयेपर्यंत सहाय्य करण्यात येणार आहे.

शासनाच्या योजनांमुळे सर्वसामान्यांना आधार

प्रधानमंत्री मोदी यांनी ठाणे आणि मुंबईतल्या ३३ हजार कोटींपेक्षा जास्तीच्या प्रकल्पांची पायाभरणी केली आहे.

शेंद्राच्या ऑरिक सिटीचं नाव तर जगभर गाजायला सुरुवात झाली आहे. टोयाटो किर्लोस्करचा २० हजार कोटींचा प्रकल्प तिथे होत आहे. लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुलीसाठी मोफत उच्च शिक्षण योजना, शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना अशा अनेक योजना सर्वसामान्यांना आधार देणाऱ्या ठरल्या असल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

महिलांना विकासाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना उपयुक्त- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशाला विकासाकडे नेण्यासाठी महिलांना विकासाच्या केंद्रस्थानी आणणे आवश्यक आहे, असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणतात. त्यानुसार महिलांना विकासाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना उपयुक्त ठरत आहे. केंद्र शासनाने महिलांसाठी बेटी बचाओ, बेटी पढाओपासून ते लखपती दीदी सारख्या विविध योजना हाती घेतल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनामार्फत लेक लाडकी योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबविण्यात येत आहे. लेक लाडकी योजनेतून मुलीच्या जन्मानंतर तिच्या बँक खात्यावर टप्प्या-टप्प्याने एक लाख रुपये जमा केले जात आहेत. महिलांना एसटी बस प्रवासात ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दरमहा दीड हजार रुपये दिले जात आहेत. ही योजना बंद होणार असलाचा अपप्रचार काही लोकांकडून केला जात आहे, मात्र यापुढेही ही योजना अशीच सुरु राहील, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी दिला.

दुष्काळमुक्तीसाठीपश्चिमवाहिनीनद्यांचे पाणी मराठवाड्यात आणण्यास मंजूरी

मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी पश्चिम वाहिन्या नद्यांचे पाणी मराठवाड्यात आणण्याच्या कामाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. पुढील काही वर्षात हे काम पूर्ण होणार असून त्यानंतर मराठवाड्यातील दुष्काळ कायमचा दूर होईल. साडेसात एचपी पर्यंतच्या कृषीपंपाला मोफत वीज पुरवठा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना शून्य रक्कमेची वीज बिले वाटप सुरु झाले आहे. या योजनेची रक्कम शासनाने महावितरणला जमा केली आहे. आता पुढील पाच वर्षे शेतकऱ्यांना वीज बिल भरण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्र हे शेतकऱ्यांची वीज कंपनी स्थापन करणारे पहिले राज्य बनले आहे, असा उल्लेख त्यांनी केला. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतून शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचा प्रयत्न केला जात आहे. या अंतर्गत कालच ५ सौर कृषी वाहिन्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. मागेल त्या शेतकऱ्याला सौर कृषीपंप देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यामध्ये सौर कृषीपंपाची ९० टक्के रक्कम राज्य शासन भरणार असून १० टक्के रक्कम शेतकऱ्याला भरावी लागेल. राज्यात आतापर्यंत ६० हजार सौर कृषिपंप लावण्यात आले असून यापैकी सर्वाधिक लाभार्थी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आहेत, असेही श्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पुरेशा निधीची तरतूद- उपमुख्यमंत्री अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पुरेशा निधीची तरतूद राज्य शासनाने केली आहे. आपल्याला अर्थसंकल्प मांडण्याचा अनुभव असल्याने सर्व बाबींचा विचार करूनच ही योजना जाहीर केली आहे. कोणत्याही परिस्थितीत ही योजना बंद होणार नाही. या योजनेच्या सुरुवातीला रक्षाबंधनापूर्वीच बहिणींच्या खात्यावर ओवाळणीची रक्कम जमा करण्यात आली होती. आता दिवाळीपूर्वीच म्हणजेच याच आठवड्यात ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याच्या रक्कमेची ओवाळणी बहिणींच्या खात्यावर जमा होईल, असे श्री.पवार म्हणाले.

राज्य सरकाने घोषणा केल्याप्रमाणे शेतकऱ्यांचे वीज बिल शून्य केले असल्याचेही सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजने'अंतर्गत शेतकऱ्यांना चालू वीज देयकाच्या पावत्यांचं वितरण आणि 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजने' अंतर्गत आस्थापित कृषी पंपांचे लोकार्पण करण्यात येत आहे. या दोन्ही योजनांमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होणार आहे. त्यातून शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याच्या दिशेनं राज्य शासनाने ठोस पाऊल टाकले आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत विज योजनेतून, राज्यातल्या ४४ लाख शेतकऱ्यांच्या साडेसात एचपी पर्यंतच्या शेतीपंपांना मोफत वीज मिळणार आहे. या योजनेसाठी आपण १४ हजार ७६१ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. 'मागेल त्याला सौर कृषी पंप' ही महत्त्वाची योजना आपल्या सरकारने सुरू केली आहे.

# बीडकरांच्या हक्काचे व्यासपीठ खांडेंचा दरबार खांडेंचा दरबार कायमच हाऊसफुल्ल



बीड(प्रतिनिधी) लोकभावना कायम कशी असते? आणि लोक कोणाच्या पाठीशी नेहमी राहतात हे सांगण्यासाठी सरपंच-उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांचा जनता दरबार पहावा असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. खांडेंचा प्रशासनामध्ये असलेला दबदबा आणि जनतेमधून असलेली प्रेमाची नाळ ही कालच्या सोमवार दि.7 ऑक्टोबरच्या जनता दरबारातून दिसून आली. जनतेच्या मनामधील एक सक्षम नेतृत्व म्हणून खांडेंची प्रसिध्दी दिवसेंदिवस वाढत आहे.

शासकिय कार्यालय, आरोग्य, प्रशासकिय कामे,पोलीस ठाणे आदि कोणत्याही ठिकाणी जी कामे लवकर मार्गी लागत नाहीत त्या कामांना गती देण्याचा यशस्वी प्रयत्न बीड जिल्ह्यात सरपंच-उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांच्या जनता दरबारातून झाला. दोन महिन्याच्या राजकिय विजनवासानंतर खांडे दि.23 सप्टेंबर रोजी घेतला पहिला जनता दरबार डबल हाऊसफुल्ल ठरला होता. त्यानंतरचा दुसरा जनता दरबार सुध्दा त्यापेक्षा डबल हाऊसफुल्ल झाल्याचे दिसून आले. खांडेंच्या दरबारातील गर्दी पहिल्या पेक्षा अधिक होती. खांडे यांच्याकडून होणारा कामाचा पाठपुरावा ही तोच आणि सर्वसामान्यांच्या चेहर्यावर काम मार्गी लागल्याचेही समाधान तेच होते. जनतेच्या सेवेसाठी मी कायम प्रयत्नरत असतो. यापुढेही त्यांची अपेक्षापुर्ती होत राहिल यासाठी मी अहोरात्र प्रयत्न करील असे कुंडलिक खांडे यांनी सांगितले.

अ बीड जिल्ह्याच्या राजकिय इतिहासात सर्वात पहिल्यांदा सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सरपंच, उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी फेब्रुवारी 2024 पासून दर सोमवारी जनता दरबार घेतला होता. दर सोमवरी सकाळी 11 ते दुपारी 3 दरम्यान श्री.खांडे सर्वसामान्यांच्या अडी अडचणी सोडवण्यासाठी हा जनता दरबार घेत होते. गत दोन महिन्याच्या राजकिय विजनवासानंतर कुंडलिक खांडे हे पुन्हा एकदा सक्रिय झाले असून बीडकरांच्या प्रश्नांसाठी एकच उपाय म्हणून खांडेंच्या दरबाराकडे पाहिले जावू शकते. या दरबारात नागरिक आपल्या व्यथा मांडल्या. त्यावर खांडे यांनी थेट संबंधित अधिकार्याला फोन लावून जाब विचारत आहेत. प्रश्न तातडीने सोडविण्याचे निर्देश अधिकार्यांना दिले. जी कामे लोक घेवून येतात, त्यांचा शक्यतो त्याच ठिकाणी पाठपुरावा झाल्याचे दिसून आले. नोकरी, बदली, विकास कामे, तक्रारी, कौतुक, आर्थिक मदत या प्रसंगी करण्यात आली. या जनता दरबारात खांडे यांनी प्रत्येकाला भेटून त्यांचे प्रश्न समजून घेतले आणि तात्काळ ते सोडवण्यासाठी संबंधित विभागाला सूचना केल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com